# प्रेस नोट ता. २७/०८/२०१९

आज दि. २७/०८/२०१९ रोजी सकाळी ११:३० ते १२:४५ या वेळेत बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे अगामी गणेशोत्सव व मोहरम उत्सावा निमित्ताने मा. अप्पर पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामिण श्री अतुल झेंडे व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी बार्शी विभाग बार्शी श्री डॉ. सिध्देश्वर भोरे यांचे नेतृत्वाखाली शांतता कमिटी, गणेश उत्सव मंडळाचे पदाधिकारी व मोहरम उत्सवाचे पदाधिकारी यांची मिटिंग घेण्यात आली. सदर मिटिंगमध्ये अगामी येणारे उत्सवादरम्यान बार्शी शहरातील विसर्जन मार्गावरील रस्ते तात्काळ दुरूस्त करून घ्यावेत. विसर्जन मार्गावर असलेले पथदिवे व बांधकाम साहित्या तसेच बार्शी शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा त्याचप्रमाणे गणेशउत्सवा दरम्यान एम एस ई बी चे अधिकारी व कर्मचारी यांनी सतर्क राहून सहकार्य करावे. त्याचप्रमाणे स्थापना मिरवणूका व विसर्जन मिरवणूकीचे दरम्यान ग्रामिण रूग्णालय येथील ॲम्ब्युलन्स सतर्क ठेवावी.असे प्रश्न नागरिकांतून निर्माण झाले होते. त्याबाबत बार्शी नगपरिषदेचे मुख्याधिकारी श्री शिवाजी गवळी, एम एस ई बी चे कार्यकारी अभियंता श्री ठाकूर, यांनी सदर बाबत मिटिंगमध्ये समक्ष चर्चा करून अगामी येणारा गणेश उत्सव व मोहरम उत्सव शांततेत पार पाडणेस आम्ही सर्वोतोपरी मदत करू असे अश्वासन दिली.

पोलीस प्रशासनाचे वतीने अगामी येणारे मोहरम उत्सव व गणेशोत्सव दरम्यान टाकण्यात येणारे मंडप हे रहदारीस अडथळा होणार नाही. व शासनाने घालून दिलेलया नियम व अटीप्रमाणेच उत्सव साजरा करावा. उत्सवा दरम्यान कोणतेही मंडळ डी जे चा वापर करणार नाहीत. या बाबत दक्षता बाळगावी अशा सुचना मिटिंग दरम्यान देण्यात आल्या. व दोन्ही शांततेत पार पाडण्याचे अवाहन केले. त्याचप्रमाणे मागील वर्षी सन २०१८ मध्ये शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमाप्रमाणे ज्या गणेश उत्सव मंडळाने सामाजीक उपक्रम राबवून गणेश उत्सव साजरा केला त्यांना पारितोषक व प्रमाण पत्र देण्यात आले १) जवाहर तरूण गणेश मंडळ , भोसले चौक बार्शी २) श्री येडेश्वरी क्रिडा व सांस्कृतीक मंडळ सुभाषनगर बार्शी ३) उत्कर्ष तरूण गणेश मंडळ, तानाजी चौक बार्शी यांना देण्यात आले. त्याचप्रमाणे मा.उपविभागीय पोलीस अधिकारी बार्शी विभाग बार्शी श्री डॉ. सिध्देश्वर भोरे यांचे नेतृत्वाखाली बार्शी डिव्हीजनमध्ये शिवाजी महाविदयालय बार्शी येथे पोलीस काका व पोलीस दिदी या उपक्रमाअंतर्गत हॉलीबॉल च्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्याचाही बक्षिस वितरण समारंभ मा. अप्पर पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामिण श्री अतुल झेंडे यांचे हस्ते करण्यात आला.

त्यानंतर मा. अप्पर पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामिण श्री अतुल झेंडे यांनी बार्शी शहरातील गणेश विसर्जन मार्गाची पाहणी करूण गणेश तलावाची पाहणी केली व योग्य त्या सुचना देण्यात आल्या.